**<u>नि.फौ.ख.क्रं. ४७/२०१८</u>** **<u>निशाणी क्र. १४</u>**

**<u>शासन .वि. परशराम पराते</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०६ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – संजय मधुकरराव देशमुख

**वय** – ५१ वर्षे, धंदा – दुकान,

**राहणार** – हमदापूर, तालुका–सेलू, जि. वर्धा.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

१. दि.०१/०४/२०१७ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी वार्ड क्र.२, हमदापूर येथे बोलविले होते. मी आरोपीच्या घराबाहेर गेलो तेथे काही लोक मला जमलेले दिसले. पोलीसांनी बाहेर येवुन पंचनामावर माझी सही घेतली. मला आता पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यावर काय लिहिला आहे मला माहित नाही. पंचनामा पोलीसांनी आधीच करुन ठेवला होता. सहीला **<u>निशाणी क्र.१५</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>साक्षीदार हा अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे सदर साक्षीदारास अभियोगपक्षाने उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली–</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा तयार केला व तेव्हा माझी सही घेतली. याबाबत मला माहिती नाही की, आरोपी घटनास्थळी होते की नाही. याबाबत मला माहिती नाही की, मी ज्यावेळी आरोपीच्या घरी गेलो तेव्हा घराच्या आतमध्ये काय झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी तेथे एका खोलीमध्ये लहान मुलीवर उपचार करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी पोलीस व काही लोक होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष लिंबू, अगरबत्ती, गुलाल, बुक्का, तावीज इत्यादि साहित्य माझ्या समक्ष जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला व मी त्यावर वाचुन सही केली. मी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान पोलीसांसोबत गेलो होतो. मी

आरोपीला ओळखतो. हमदापूर येथे माझी कपडयाची दुकान आहे. हमदापूर २००० लोकसंख्या असलेला गाव आहे. गावात सर्वांना माहिती आहे की, पराते हे एलोपैथीक डॉक्टर आहे. मी कधी ही आरोपीकडे उपचारासाठी गेलेलो नाही. आरोपीला पकडुन गावात इतर चार ते पाच डॉक्टर आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ आर.व्ही.मुन यांच्या मार्फत :**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांच्या सांगण्यावरुन केवळ पंचनामावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.12.18 17:21:18 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : १८/१२/२०२५